जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर
ईमेल :- cp.thane.pro@mahapolice.gov.in
मो.क्र. ९८१९२०८२७९

दिनांक १३/११/२०२५

अंमली पदार्थ विरोधी पथक, गुन्हे शाखा, ठाणे ची कामगिरी

''मध्यप्रदेश राज्यातुन महाराष्ट्र राज्यात मॅफेड्रॉन (एम.डी.) या अंमली पदार्थाची तस्करी करणारे ०४ आरोपींना ताब्यात घेवुन १ किलो ७१ ग्रॅम ६ मिलीग्रॅम वजनाच्या मॅफेड्रॉन (एम.डी.) या अंमली पदार्थासह २,२४,७५,५००/- रु. किंमतीचा मुद्येमाल जप्त ''

———————————oooooooooo———————————

मा. पोलीस आयुक्त, ठाणे यांनी अंमली पदार्थ विक्री संदर्भात विशेष मोहीम राबवुन कडक कारवाई करण्या संदर्भात आदेश दिले होते. त्याअनुषंगाने मा. अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, ठाणे श्री. श्रीकांत पाठक, व मा. पोलीस उप आयुक्त, गुन्हे, ठाणे श्री. अमरसिंह जाधव यांनी सुचना दिल्या होत्या. त्याअनुषंगाने मा. सहा. पोलीस आयुक्त, प्रशासन, ठाणे श्री. रविंद्र दौंडकर यांच्या सुचनेप्रमाणे अंमली पदार्थ विरोधी पथक, गुन्हे शाखा, ठाणे चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. राहुल मस्के यांनी विशेष मोहिम राबविली होती.

दिनांक ०३/११/२०२५ रोजी पोहवा/अमित सकपाळ यांना प्राप्त माहितीच्या आधारे मा. वरिष्ठांच्या परवानगीने पंचासमक्ष सापळा कारवाई केली असता, दिनांक ०३/११/२०२५ रोजी १८:२० वा.चे सुमारास एमटीएनएल कार्यालयासमोर, चरई, नौपाडा, ठाणे या ठिकाणी इसम नामे १) इम्रान उर्फ बब्बु खिजहार खान, वय ३७ वर्षे, २) वकास अब्दुलरब खान, वय ३० वर्षे, ३) ताकुददीन रफीक खान, वय ३० वर्षे, ४) कमलेश अजय चौहान, वय २३ वर्षे, सर्व रा. मध्यप्रदेश यांनी आपसात संगणमत करून आपल्या ताब्यात एकूण रू. २,१४,३२,०००/- किमतीचा एकुण १ किलो ७१ ग्रॅम ६ मिलीग्रॅम वजनाचा 'एमडी (Mephedron) हा अंमली पदार्थ विक्री करणेकरीता बाळगले असताना मिळुन आलेले आहेत. **सदर गुन्हयात वापर केलेल्या चारचाकी वाहनासह एकुण २,२४,७५,५००/- रू. किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.** सदरबाबत नौपाडा पो. स्टे., ठाणे येथे गुन्हा नोंद क्रमांक ६९९/२०२५ एन.डी. पी.एस. कायदा कलम ८(क), २२ (क), २९ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदरचा अंमली पदार्थाचे उत्पादन, विक्री, वाहतुक, साठवणुक यामध्ये कोण - कोण सहभागी आहे ? याबाबतचा तपास सुरू आहे. अटक आरोपी यांची दिनांक १५/११/२०२५ रोजी पावेतो पोलीस कस्टडी रिमांड मंजुर आहे.

अटक आरोपी यांच्यापैकी ०२ आरोपी हे रेकार्ड वरिल गुन्हेगार असुन त्यांच्या विरूद्ध मध्यप्रदेश राज्यातील विविध पोलीस ठाण्यात खालीलप्रमाणे गुन्हे नोंद आहेत.

१) इम्रान उर्फ बब्बु खिजहार खान

अ.क्रं.	पोलीस स्टेशन	गु.र.क्रं. व कलम
१	धरमपुरी	१३७/२००५ भादवि कलम ३७९ प्रमाणे
२	धरमपुरी	१०१/२००८ भादवि कलम ३०४ (ब), ४९८ (अ), ३४ प्रमाणे
३	धरमपुरी	२३/२०२० भादवि कलम १८८ प्रमाणे
४	धरमपुरी	९९/२०५ गोवंश हत्या अधिनियम २००४ चे कलम ४, ९, भारतीय न्याय संहिता कलम ३२५, १९६(१) (ब) प्रमाणे
५	नागलवाडी	१६८/२०१५ गोवंश हत्या अधिनियम २००४ चे कलम ४,६,९ पशू कुरता अधिनियम ११ घ प्रमाणे
६	कसरावद	१२/२०१८ भादवि कलम १४७, १४९, ३३६, ५०६ प्रमाणे
७	रावजी बाजार इंदौर	१६१/२०१९ भादवि कलम ४०६, ४०५,४८२, ३४ प्रमाणे

(कृ. मा. प.)

Scanned with OKEN Scanner

२) कमलेश अजय चौहान

अ.क्रं.	पोलीस स्टेशन	गु.र.क्रं. व कलम
१	धामनोद	६६८/२०१६ भा.द.वि. ४५२,३२३,२९४,५०६,३४
२	धामनोद	८३२/२०२४ भा.न्या.सं. ८७,६४(२)(एम),३५१(३),

सदरची कामगिरी मा. वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी पथक, गुन्हे शाखा, ठाणे चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. राहुल मस्के, सपोनि/ निलेश मोरे, सोमनाथ कर्णवर पाटील, पोउपनि/ राजेंद्र निकम, दिपक डुम्मलवाड, पोहवा/अमोल देसाई, हरिष तावडे, अभिजीत मोरे, अजय सपकाळ, शिवाजी रावते, अमोल पवार, संदीप चव्हाण, नंदकिशोर सोनगिरे, अमित सकपाळ, हुसेन तडवी, गिरीष पाटील, चापोना/अनुप राक्षे, मपोहवा/ शिल्पा कसबे, मपोशि/ कोमल लादे, पोशि/ आबाजी चव्हाण यांनी केली आहे.

आवाहन :- अंमली पदार्थ विक्री, साठवणुक, वाहतुक, सेवन करणे हा अपराध असुन यामध्ये सहभागी असलेले इसमांबाबत कोणतीही माहिती उपलब्ध असल्यास अंमली पदार्थ विरोधी पथक, गुन्हे शाखा, ठाणे शहर येथे द्यावी. माहिती देणारे इसमांची नांवे गुप्त ठेवली जातील.

--------ooooo---------

Scanned with OKEN Scanner